शिंदे समितीला मुदतवाढ दिली आता मनुष्यबळ देखील द्या : मनोज जरांगे पाटील >>पान 2

दारूबंदीच्या मागणीसाठी शेरज खुर्द च्या महिला धडकल्या कोरपणा पोलीस ठाण्यावर >>पान 3

निकृष्ट कामाबाबत न्यायालयात दाद मागण्याचा ग्रामसभेचा ठराव >>पान 4

सुविचार

आत्मविश्वास म्हणजेच यशस्वी जीवनाचा पाया.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



जावयाचा सासुरवाडीतील नागरिकांना चुना!

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 184 ■ शुक्रवार, दि. 14 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे याना जनतेने नाकारलंय : चंद्रशेखर बावनकुळे

अकोला/प्रतिनिधी : महायुती प्रचंड ताकदवान, आणि पुढील अनेक वर्ष महायुती टिकणार, यापूर्वी २५ वर्ष भाजप शिवसेना युती टिकवली.पुढही महायुतीला उच्च स्थान देत महायुती टिकवण्याचा प्रयत्न करतोय.राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना जनतेने नाकारलंय अशी टीका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले ते अकोला येथे माध्यमांशी बोलत होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वाळू माफिया नियंत्रणासाठी राज्यात जिल्हाधिकारी आणि पोलिसांना मोठ्या प्रमाणात अधिकार प्रदान केले असल्याचे सांगितले तसेच वाळू माफियांना जेलबंद करण्याची योजना सुरू

## महाविकास आघाडीवर टीका

केली.जिल्हाधिकारी आणि पोलिसांमार्फत वाळू माफियांवर हद्दपार तसेच मकोपा लावण्याचा सिकंजा हाती घेतला. राज्यात लवकरच वाळू धोरण राबवणार, जेणेकरून लोकांना स्वस्त दरात वाळू उपलब्ध होणार आहे. कालच एकनाथ शिंदे यांच्यासोबत बोलणं झालं, कुठलही नाराजी नाही, रोज आम्ही भेटतो, एकत्र बसतो आणि चहा पितोय. बसून एकमत निर्णय घेतोही असेही बानगुड म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांच्या सारखा महायुतीला प्रचंड मजबुती देणारा नेता आहे. महायुतीला मजबूत करीत मुख्यमंत्रीपद पुढे घेऊन जातायेत.त्यामुळे महायुतीला कुठलेही ठिणगी पडणार नाही. आदित्य ठाकरे आणि राहुल गांधी यांची भेट झाली आहे मात्र, अकार्यक्षम नेत्यांचा हा ग्रुप आहे. ज्या नेत्यांना जनतेमध्ये जाऊन काम करता येत नाही, तेच आता मशीन आणि आयोगावर ठपके ठेवत आपलं राजकारण चालवण्याचं काम करतायेत.आज राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना जनतेने नाकारलंय आहे.



शरद पवारांनी एकनाथ शिंदेचा सत्कार केला म्हणजे, उद्धव ठाकरे यांच्यापेक्षा एकनाथ शिंदे चांगले मुख्यमंत्री होते.म्हणून, घाईघाईत आदित्य ठाकरे राहुल गांधींना भेटायला गेलेत. असावेत असे मत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

## येत्या २८ तारखेला अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये पक्षप्रवेश करणार - मोहन अण्णा हंबर्डे



दैनिक आपला विदर्भ

नांदेड/प्रतिनिधी : नांदेड दक्षिणचे माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये येत्या २८ तारखेला पक्षप्रवेश करणार असून, पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना माजी आमदार म्हणाले की, मी २००७ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा सभापती होतो. त्यामुळे माझा पक्ष प्रवेश होत नसून, मी स्वगृही जात आहे व मी माझ्या कार्यकर्त्यांना विश्र्वासात घेऊन हा निर्णय घेतला आहे. कार्यकर्त्यांचे देखील म्हणणे आहे की, आपण सत्य सोबत राहावे, जेणेकरून मी जे केलेले विकास कामे आहेत त्याला गती मिळणार आहे. या हेतूने मी हा पक्षप्रवेश करणार आहे.

## कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची आदित्य ठाकरेंवर टीका



दैनिक आपला विदर्भ

अकोला/प्रतिनिधी : राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर आजच्या दिल्ली वारीवरून जोरदार टीका केली आहे. आदित्य ठाकरे आणि राहुल गांधी या दोघांनाही काही सूचत नाही. त्यामुळे काहीच न समजणारे हे दोन्ही नेते भेटत असतात, असा टोला त्यांनी लगावलाय. दरम्यान, आम्ही कायम त्यांच्यावर प्रेम केलंय. मात्र, ते आमचं प्रेम समजू शकले नाहीय. आणि २०१९ मध्ये त्यांनीच आमचं प्रेम तोडल्याचा टोला फुंडकरांनी ठाकरे गटाला लगावला आहे.

## उद्धव ठाकरेंकडे कोणी शिल्लक राहणार नाही रामदास कदम

रत्नागिरी/प्रतिनिधी : राजन साळवींनी संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिलं की, उद्धव ठाकरेंना मी शेवटपर्यंत साथ देण्याचा प्रयत्न केला. पण आज त्यांच्याकडे सगळं संपलेलं आहे. उद्धव ठाकरेंकडे कोणीही शिल्लक राहणार नाही, अशी टीका प्रसार माध्यमांशी बोलताना शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेवर केली.

एवढी ते पुढे म्हणाले की, राजन आणि माझे सख्ख्या भावासारखे संबंध आहेत. काल मला त्याचा फोन आला होता, मला समाधान वाटलं. आम्ही जेव्हा निर्णय घेतला, तेव्हाही तुम्ही आमच्यासोबत या म्हणून फोन नाही केला. त्यावेळी बोललो असतो तर, बदल झाला असता. काल मला त्यांनी फोन करून सांगितलं, भाई मी तुमच्यासोबत येतोय, माझ्यावर लक्ष ठेवा.काही काळजी करू नको असं मी सांगितलं. वैभव नाईक आणि माझेही संबंध जवळचे आहेत, पण मी त्याला आतापर्यंत कधीही फोन केला नाही. आम्ही भूमिका का घेतली हे काही लोकांना आता कळतंय.कधी कधी सत्य हे



पचत नसतं, अशीच अवस्था आता संजय राऊत आणि विनायक राऊत यांची झाली आहे.जे वास्तव आहे ते शरद पवार बोलले. वास्तव नसतं तर शिंदे यांना हा दिवस मिळाला नसता.ज्यांनी पुरस्कार दिला ते नालायक आहेत, असं संजय राऊत यांना म्हणायचं आहे का? शरद पवारांवर बोलायची संजय राऊत आणि विनायक राऊत यांची औकात नाही.बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवारांचे वैचारिक मतभेद नव्हते. बोलतात ते फक्त प्रसिद्धी मिळवण्यासाठी बोलतात.


प्रसिद्धी मिळवण्यासाठी हे फक्त नौटंकी आहे. मात्र, यात काही तथ्य नाही. शरद पवारांचा अभ्यास दांडगा आहे, प्रचंड आहे. पवारांना ठाण्याचा नाही संपूर्ण देशाच्या कानाकोपऱ्याचा अभ्यास आहे. आपण कोणावर काय बोलतो याचं भान संजय राऊत यांनी ठेवलं पाहिजे. उद्धव ठाकरेंसोबत कोणीच शिल्लक राहणार नाही, मी आधीच बोललो होतो. राजन साळवींचा पक्षप्रवेश म्हणजे उद्धव ठाकरेंच्या सणसणीत राजकीय कानफटात लागली आहे.अजून पुष्कळ लोक प्रवेशासाठी रांगेत उभे आहेत. उद्धव ठाकरेंकडे कोणी शिल्लक राहणार नाही. हम दो हमारे दो एवढेच शिल्लक राहणार मातोश्रीकडे, बाकी कोणी शिल्लक राहणार नाही, ये तो झाकी है, और बहुत कुछ बाकी है असे म्हणत उद्धव ठाकरे शिवसेनेवर शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम टीका केली.

## संधीचे मी निश्चित सोनं करेल - हर्षवर्धन सपकाळ

### कॉंग्रेसचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पहिली प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

बुलडाणा/प्रतिनिधी : सर्वसामान्य परिवारातील कुठलाही राजकीय वारसा नसताना एका सामान्य कार्यकर्त्याला पक्षाने जी संधी दिली ही फार मोठी संधी आहे. आणि या संधीचे मी निश्र्चित सोनं करेल, अशी पहिली प्रतिक्रिया कॉंग्रेसचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.



तर जाती-धर्माच्या नावावर चाललेला नंगानाच थांबवण्याची आवश्यकता आहे असं वक्तव्य कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. कोण कोण्या जातीचा हे बघून जर किराणा घेतला जात असेल, वारकरी संप्रदायामध्ये कीर्तनाला महाराजांना बोलावलं जात असेल तर हे पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्राला अशोभनीय आहे, हा शाप दूर करण्याची आवश्यकता आहे. एका हातात संविधान आणि दुसऱ्या हातात भारताची संस्कृती पुढे घेऊन जाणार आहोत. फोडा तोडा आणि राज्य करा हे इंग्रजाचे मूल्य आजही काही राजकारणी अमलात आणत आहेत.

## उबाठा नावाचा गट आता संपलेला आहे : नितेश राणे यांचे उद्धव ठाकरे गटावर टीका

दैनिक आपला विदर्भ

सिंधुदुर्ग/प्रतिनिधी : ठाकरे सेनेच्या नगरसेवकांचा भाजप प्रवेश ही फक्त सुरुवात असल्याचे सांगत नगरसेवक, तालुकाप्रमुख, जिल्हाप्रमुख नंतर माजी आमदार अशी रांग लागलेली आहे. आम्हाला फक्त तारीख ठरवायची आहे. उबाठा नावाचा गट आता संपलेला आहे. अशी टीका सिंधुदुर्ग चे पालकमंत्री नितेश राणे यांनी उद्धव ठाकरे शिवसेना गटावर केली. यावेळी ते म्हणाले की, बाळासाहेबांचे विचार तिथे राहिलेले नाहीत. महाविकास आघाडीची भावपूर्ण श्रद्धांजली झालेली आहे. त्यामुळे जिल्ह्याचा विकास केवळ भाजपा करू शकते हा विश्र्वास जनतेत बसलाय. त्यामुळे चांगले कार्यकर्ते भाजपात प्रवेश करत आहेत. मात्र, आम्ही चांगल्यातले चांगले कार्यकर्ते घेतो, घाण घेत नाही. येणाऱ्या काळात भाजपा कोकणात एक नंबरचा पक्ष असेल. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका कोर्टाच्या आदेशानुसार कधीही लागू शकतात. भाजपाच विकास करू शकतो, सत्तेच्या आणि विकासाच्या सगळ्या चाव्या आमच्याकडे आहेत. त्यामुळे भाजपा एक नंबरची चॉईस आहे. सिंधुदुर्ग और महाराष्ट्र मे सिर्फ कमल अशा पद्धतीच चित्र दिसतंय. आदित्य ठाकरे फार विद्वान आहेत. पहिले त्यांनी राज ठाकरेंना बरोबर घ्यायचं का ? हे स्वतःच्या आईला विचारावं आणि तिथून तयारी असेल तर अशी मोठमोठी वक्तव्य करावे, भूमिका कोणी बदलली, हिंदुत्व कोणी सोडले हे संपूर्ण महाराष्ट्राला माहित आहे. बाळासाहेबांचा मुलगा आणि नातवाने बाळासाहेबांचे विचार कसे रसातळाला नेले हे पूर्ण महाराष्ट्र बघतेय.त्यामुळे भूमिका बदलण्यावर त्यांनी तोंड उघडू नये, आता चांगल्या विचाराचे निष्ठावान कार्यकर्ते तुम्हाला महायुतीमध्ये येताना दिसतील. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत विरोधकांना उमेदवार मिळेल का ? ही पण आतां शंकाच आहे. त्यामुळे येणाऱ्या सर्व निवडणुकात भाजपा आणि महायुतीचा झेंडा तुम्हाला सगळीकडे दिसेल, अशी माहितीही पालकमंत्री नितेश राणे यांनी दिली.

## दोंडाईचा बसस्थानकातून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिला पोलिसांच्या ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

धुळे/प्रतिनिधी : दोंडाईचा येथील बसस्थानकातून बसमध्ये चढलेल्या महिलेचे सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या एका महिलेला धुळे स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने जेरबंद केले. धुळे एलसीबीच्या पथकाने धुळ्यातील नागवबारी परिसरातून या सराईत आरोपी असलेली महिलेला ताब्यात घेत तिच्याकडून हजार रुपये किमतीची चैन देखील जप्त केले आहे.

सुरत ते शिरपूर बस मधून प्रवास करणाऱ्या रजेसिंग बंडू सिंग राजपूत रा. अहिल्यापुर ता. शिरपूर यांची पत्नी आणि ते प्रवास करीत असताना त्यांच्या बागेतील २ तोळ्याची सोन्याची चैन गर्दीचा फायदा घेत चोरून नेली. आपला बॅगातून सोन्याची चैन चोरी झाल्याची त्यांच्या लक्षात त्यांनी लागलीच धुळे युसीबीच्या पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना या संदर्भात माहिती दिली असता त्यांनी लागलीच पथक तयार करून या चोराचा शोध घेण्यास सुरुवात केली. धुळे शहरातील नववारी परिसरात एक महिला संक्षेत्रिता फिरत असताना आढळून आली व तिची चौकशी केली असता तिच्याकडे सोन्याची चेन आढळून आली व तिनेच ही चैन चोरली असल्याचे कबूल केले. याप्रकरणी सदर महिला विरोधात गुन्हा दाखल केला असून तिची कसून चौकशी केली जात असल्याची माहिती पोलीस निरीक्षक श्री राम पवार यांनी यावेळी दिली.

# ठाकरे गटातील नेत्यांना संन्यास घेतल्याशिवाय मार्ग नाही : राधाकृष्ण विखे पाटील यांची टिका

दैनिक आपला विदर्भ

नागपूर/प्रतिनिधी : महाविकास आघाडी सत्तेत आल्यापासून त्याची बिघाडी सुरु होती. सत्ता मिळवणे हा एकमेव उद्देश होता. राज्याच्या किंवा समाजाच्या हितासाठी ते एकत्र आले नव्हते तर सत्ता मिळवणे हा एकमेव हेतू होता. शरद पवारांबद्दल त्यांना का राग आहे आणि शरद पवारांना कशासाठी फारकत घ्यायची हे त्या दोघांना माहिती. मात्र, ठाकरे गटातील नेत्यांना संन्यास घेतल्याशिवाय पर्याय नाही, अशी बोचरी टीका राधाकृष्ण विखे पाटील यांनी ठाकरे गटावर केली.



यावेळी राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, राज्यात सुरू असलेल्या कल्याणकारी योजना या जनतेच्या हितासाठी आपण सुरू केले आहेत. न्यायालयाने काय मत मांडले याबद्दल मला काही माहिती नाही, शेतीमध्ये मजूर मिळत नाही हे सगळे कारणे असले तरी याकरिता योजना बंद करण्याची गरज नाही, वेगळा पर्याय असू शकतो यावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. कोण कुठे जात आहे, त्याबद्दल मला जास्त माहिती नाही, मात्र, ठाकरे गटाचे नेते यांना संन्यास घेतल्याशिवाय मार्ग नाही. म्हणून ते पर्याय शोधत आहे. ज्यावेळी संपर्कात असल्याची चर्चा होते. तेव्हा काही लोकांची मानसिकता असेल. मात्र, माझ्या कोणी संपर्कात नाही. सत्ता होती म्हणून लोक होते. आता कॉंग्रेसची सत्ता नाही आणि येण्याची शक्यता नाही. एवढी निश्र्चांकी कॉंग्रेसने कधी गाठली नव्हती. त्यामुळे प्रत्येक जण दुसरीकडे बोट दाखवत आहे. प्रदेश अध्यक्ष पद कोणी घ्यायला तयार नाही. हर्षवर्धन माझा चांगला मित्र आहे. त्याला संधी मिळाली तर चांगली गोष्ट. मात्र, दिग्गज यांना डावलून संधी दिली हे म्हणणं योग्य नाही.कारण दिग्गजच पळून गेले सगळे. सत्ता नाही म्हणून संधी नाकारणारे हे दिग्गज यांचं पक्षश्रेष्ठी समोर पितळ उघड होत आहे. शिवभोजन थाळी बंद करण्यासंदर्भातले कोणतेही आदेश झाल्याचे माझ्या निदर्शनास नाही. सरकार उत्तम सुरू आहे, कोणतीही नाराजी नाही.सरकार चांगलं चालत असल्याने काही लोकांना नाराजी होत आहे. अशी टीका राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

## सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान मधुबाला

आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मरलीन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९२ वी जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५६ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# शिंदे समितीला मुदतवाढ दिली आता मनुष्यबळ देखील द्या : मनोज जरांगे पाटील

दैनिक आपला विदर्भ

जालना/प्रतिनिधी : सरकारने शिंदे समितीला मुदतवाढ दिली ही चांगली गोष्ट आहे. सरकारचं कौतुक करतो, उदय सामंत यांचा सल्ला मी ऐकला आहे. शिंदे समितीला मुदतवाढ दिली आता मनुष्यबळ देखील द्या, ठरलेल्या चारही मागण्या तातडीनं लागू करा, १५ तारखेपासून साखळी उपोषण करायचं की नाही, हे उद्या अंतरवालीत पत्रकार परिषद घेऊन जाहीर करणार आहे. अशी माहिती मनोज रंगे पाटील यांनी प्रसार माध्यमाचे बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, तुम्ही जाणून-बुजून वेळ लावता आणि आम्ही गप्प का बसलो हे सुद्धा आज सांगतो, मंत्री उदय सामंत यांनी एक वक्तव्य केले होते की, मित्र म्हणून सल्ला आहे. त्यांनी संयम पाळावा त्यांचा सल्ला मी मान्य केलेला आहे. आणि आम्ही शांत झालो आम्ही सन्मानाने सरकारला सहकार्य करत आहे, हे ओळखून घेतलं पाहिजे, शेवटी समाजाच्या लेकरांच हित महत्त्वाचं असते. आपल्या पूर्ण मागण्या आठ होत्या काल त्यांनी त्या मधल्या चार तात्काळ मंजुरी देतो म्हणून सांगितले. त्या चार पैकी सुद्धा दोन केल्या, त्यामध्ये एक शिंदे समितीला मुदत वाढ, त्यामुळे आमची एक विनंती आहे. शिंदे समितीला मुदत वाढ दिली तिला मनुष्यबळ द्या तिला बसवून ठेवू नका, फक्त मुदत वाढ देऊन उपयोग नाही आता जिल्ह्यात महाराष्ट्रभर गेली पाहिजे आणि तिने नोंदी शोधल्या पाहिजे, हे सर्वात महत्त्वाचे आहे.दुसरी गोष्ट म्हणजे कक्ष दिले पाहिजे आणि मनुष्यबळ तातडीने दिले पाहिजे, त्यांना निधी कमी पडता कामा नये, सगळ्या व्हॅलिडीटी झाल्या पाहिजे आणि जे प्रमाणपत्र रोखून धरले ते तात्काळ दिले पाहिजे, हे आता मुख्य समितीच्या पाठीमागे असले पाहिजे. हैदराबाद गॅझेट लागू करतो, असं तुम्ही काल शासन निर्णय सांगितले, बॉम्बे गव्हर्मेंट आणि सातारा संस्थान हे आता शिंदे समितीकडे आहे.आता सरकार त्याच्यावर अभ्यास करणार आहे. गॅझेट चा अभ्यास शिंदे समितीने केलेला आहे. आता तो सरकारला करायचा आहे. त्यामुळे गॅझेटच्या अंमलबजावणीची वाट आम्ही आता पाहतोय, केसेस मागे घ्या, बलिदान गेलेल्या कुटुंबाचे विषयी त्यामध्ये घेतलेले आहे. या चार मागण्या ज्या ठरलेल्या आहेत. त्या तातडीने लागू करा, अशी मागणी मनोजरांगे पाटील यांनी केली तसेच १५ फेब्रुवारी पासून उपोषणाबाबत आम्ही गावकरी उद्या ठरवतोय, उद्या सकाळी आंतरवाली मध्ये पत्रकार परिषद घेऊन त्या संदर्भात जाहीर करू. परंतु आता मागण्या मान्य करायला लागले म्हणून आम्ही सुद्धा बोलणार नाही. फक्त तुम्ही खोटं करू नका हे आमचे मागणे आहे. असे मत मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले.



# खामगाव जालना रेल्वे मार्गासाठी येणाऱ्या अर्थसंकल्पात तरतूद करा

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची प्रत्यक्षात भेट घेऊन केली मागणी

बुलडाणा/प्रतिनिधी :येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये खामगाव जालना रेल्वे मार्गसाठी ५०% निधीची तरतूद करावी अशी मागणी केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून केली आहे ..

बुलढाणा जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण ठरणारा आणि मध्य व सेंट्रल रेल्वेला जोडणारा महत्वकांशी असा खामगाव जालना रेल्वे मार्ग पुंजी निवेश कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आला आहे या रेल्वे मार्गासाठी लागणारा ५०% निधीचा वाटा राज्य सरकारने उचलला असून त्या संदर्भाची तरतूद ही अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे तर आता केंद्र सरकारने सुद्धा उर्वरित पन्नास टक्के निधीची तरतूद येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये करावी अशी मागणी केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज १३ फेब्रुवारी रोजी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली या रेल्वे मार्गामुळे मध्य व सेंट्रल रेल्वे जोडल्या जाणार असून जिल्ह्याच्या विकासालाही गती मिळणार आहे त्या दृष्टिकोनातून खामगाव जालना रेल्वे मार्गासाठी ५० टक्के आर्थिक निधीची तरतूद करावी अशी विनंती ही त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.



### रेल्वे मार्गासाठी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचे सातत्याने प्रयत्न

बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून सन २००९ मध्ये प्रथमच निवडून गेल्यानंतर खासदार प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा जालना रेल्वे मार्गासाठी प्रयत्न सुरू केले होते लोकसभेत वेळोवेळी प्रश्न उपस्थित करून हा प्रश्न लावून धरला होता त्यामुळे या रेल्वेच्या सर्वेक्षणाला मंजुरात मिळाली त्यानंतर हा रेल्वे मार्ग पुंजी निवेश कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात संदर्भात केंद्र सरकारने तत्वतः मान्यता दिली त्यानंतर महाराष्ट्र सरकारकडूनही ५०% निधीची तरतूद केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी तत्कालीन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्याशी प्रत्यक्षात भेट घेऊन या रेल्वे मार्गावर अर्थसंकल्पामध्ये तरतूद करून घेतली त्यानंतर आता उर्वरीत केंद्र सरकारचा ५०% हिस्सा मिळवण्याच्या दृष्टिकोनातून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली आहे ..

## ज्यांना गरज आहे त्यांना लाडक्या बहिण योजनेचा लाभ मिळावा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची पत्रकार परिषद

दैनिक आपला विदर्भ

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : लाडकी बहिण योजनेचा लाभ ज्याला गरज आहे. त्याला मिळायला हरकत नाही. मात्र, ज्यांना गरज नाही त्यांना देखील दिला जात आहे.आज रोजगार, शिक्षणावर सरकार पुरेसे काम करू शकत नाही. असे मत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केले. ते छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.



यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, ४० आमदार गेले तेव्हा धक्का बसला नाही आणि आता माजी आमदार गेल्याने काय धक्का बसणार? मात्र, ते चांगले शिवसैनिक आहेत, शिवसेना आजही पूर्वीच्या ताकतीनशी उभी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.सरकार ने भोजन सोडले तर, महागात पडेल. मला माहिती नाही शिंदे नाराज आहेत की नाही. मात्र, कुरघोडी चालू आहे. त्यांच्या काळातही आहे आणि फडणवीसांच्या काळातही आहे. खासदारांनी स्नेह भोजन हे व्यक्तिगत संबंधाने केले असेल, याबाबत मला माहिती नाही असे सांगून सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी देशोधडीला लावण्याचं काम सरकार करीत आहे. केंद्राची मुदत सरकारने वाढविली पाहिजे, खरेदी केंद्र किती होते, आणि किती खरेदी केले याचा हिशोब लावला तर सर्व शेतकऱ्यांची खरेदीचा नियोजन सरकार कडून नव्हते हे सिद्ध होणार आहे.लाडकी बहिण योजना सुरू झाली, अख्ख्या महाराष्ट्राचे अनुदान देणे बाकी आहे.विमा देण्याचे बाकी आहे. सरकारची नियत नाही द्यायची अशी टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत केली.

# अभिजात मराठीचा 'ऑनलाईन जागर'!

## दिल्लीत साहित्य संमेलनाचे आयोजन ; माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा उपक्रम, व्हिडिओ पाठवून सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

बुलडाणा/प्रतिनिधी : दि. २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने अभिजात मराठीचा 'ऑनलाइन जागर' हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात आपल्या कलागुणांचा व्हिडिओ शेअर करून देश विदेशातील मराठी माणसांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे.

या उपक्रमात कसे सहभागी व्हाल? आपण स्वतः कवी, लेखक, कलाकार, गायक असाल तर आपल्या स्वरचित कवितेचा अथवा आपल्या कलाकृतीचा एक सुंदर व्हिडिओ तयार करून आम्हाला पाठवा. केवळ आपल्याच कविता नाही तर इतर मान्यवर कवींच्या कवितांचे सादरीकरणही ( वाचन )आपण करू शकता. याबरोबरच गझल वाचन, गायन, लोककला सादरीकरण अशा अनेक स्वरूपात आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. अभिजात मराठीच्या या ऑनलाईन जागरामध्ये आपण अभंग, पोवाडे, नाट्यछटा, लघुकथा, गायन, भारुड आधी कलांच्या माध्यमातून सहभागी होऊ शकता. अभिजात मराठीच्या या उत्सवात आपला सहभाग हा आपल्या भाषेचा गौरव वाढविणारा ठरेल. तर चला मग करा रेकॉर्ड आपला व्हिडिओ आणि पाठवा आम्हाला.

आपले व्हिडिओ हे माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'महासंवाद' या पोर्टल वर आणि महासंचालनालयाच्या राज्यभरातील कार्यालयांच्या अधिकृत समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करण्यात येतील.

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

आपले व्हिडिओ इथे पाठवा ईमेल : dgiprdlogmail.com या ईमेलवर अथवा या व्हॉट्सअॅप क्रमांकावर. ९८९२६६०९३३ आणि ७५०४६९६७८६. महाराष्ट्राला साहित्याची समृद्ध परंपरा लाभली आहे. ९८ वे अखील भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठी भाषेच्या श्रीमंतीचा उत्सव साजरा करण्याची संधी आहे. आपल्या शब्दांनी आणि कलाकृतींनी ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अधिक संस्मरणीय बनवावे, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने करण्यात येत आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या खालील समाजमाध्यमांवर उत्कृष्ट व्हिडिओ व कलाकृतीला प्रसिद्धी देण्यात येईल

महासंवाद - https://mahasamvad.in/

एक्स - https://twitter.com/MahaDGIPR

फेसबुक - https://www.facebook.com/MahaDGIPR

इन्स्टाग्राम - https://www.instagram.com/mahadgipr

युट्यूब - https://www.youtube.co/M-H-R-SHTR-DGIPR

टेलिग्राम चॅनल - https://t.me/MahaDGIPR

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# दारूबंदीच्या मागणीसाठी शेरज खुर्द च्या महिला धडकल्या कोरपणा पोलीस ठाण्यावर

दैनिक आपला विदर्भ

■ मनोज गोरे

कोरपणा : कोरपणा तालुक्यातील शेरज. खुर्द ता.कोरपणा येथील महिला १३ फरवरी गुरुवारी दुपारी एक वाजता च्या दरम्यान गावात होणारी अवैध दारू विक्री बंद करण्याच्या मागणीसाठी कोरपणा पोलीस ठाण्यावर धडकल्या.दारूबंदीच्या मागणीसाठी शेरज खुर्द च्या महिला धडकल्या कोरपणा पोलीस ठाण्यावर ग्रामपंचायतीने केला दारूबंदीचा ठराव गावात दारूमुळे होतात भांडणतंटे शेरज खुर्द. ता.कोरपणा येथील महिला गुरुवारी गावात होणारी अवैध दारू विक्री बंद करण्याच्या मागणीसाठी कोरपणा पोलीस ठाण्यावर धडकल्या. महिलांसह ग्रामस्थांनी पोलिसांना निवेदन दिले.ग्रामपंचायतीने गावात दारूबंदीचा ठराव २६ जाणेवारीला




केला आहे. दारूमुळे गावात भांडणतंटे होतात व कौटुंबिक वाद वाढत असल्याने दारू विक्री बंद करण्याची मागणी यावेळी महिलांनी केली. शेरज खुर्द येथील महिला उज्वला विनायक हुलके, पुष्पाताई मोहन उराडे, अर्चना महेश गिलबिले, अर्चना अविनाश हुलके, सुनंदा सुरेश डाकरे, यशोधरा दीपक निमसटकर,शालिनी गिरधर कोठे, उज्वला रमेश चिंचोलकर, निर्गुणा भगवान राजूरकर,वंदना गणेश नींदेकर,गीता ताई जगदीश खनके, लिलाबाई निळकंठ गाताडे, जोशना दत्ता धवडे, सुमनबाई जनार्दन खनके, संगीता तेजराज बुचुंडे. स्वतः गावातील सरपंच अर्चना महेश गिलबिले महिलांसोबत उपस्थित होत्या यांच्यासह ग्रामस्थांनी गावातील अवैध दारूबंदी करण्याबाबत सरपंच व ग्रामसेवक यांना निवेदन दिले होते. सरपंच अर्चना महेश गिलबिले व ग्रामसेवक यांनी समस्त गावातील नागरिकांच्या उपस्थितीत ठराव घेण्यात आला सदर या ठरावाची प्रत कोरपणा पोलीस स्टेशन यांना देण्यात आली तसेच गावातील पोलीस पाटील यांना निवेदन दिले स्वतः ग्रामस्थ त्यांना माहिती देऊन पोलीस स्टेशनला उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले मात्र गावकऱ्यांच्या निमंत्रणाला दूरध्वनीद्वारे संपर्क केला असता पोलीस पाटील यांचा फोन नॉट रिचेबल दाखवीत होता ग्रामस्थांना पोलिस स्टेशन मध्ये येतो असे सांगितले मात्र स्वतः उपस्थित न राहिल्याने ग्रामस्थांमध्ये पोलीस पाटील यांच्या कार्यशैलीवर ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केला असून पोलीस पाटील शासनाचे मानधन घेतात मात्र गावातील अवैद्य व्यवसायांची माहिती पोलीस स्टेशन पर्यंत पोहोचवीत नाही असा थेट आरोप ग्रामस्थांनी पोलीस पाटलांवर केला. गावाची काय घेणेदेणे नसणारे अशा पोलीस पाटलांचा काय उपयोग? कोकणा पोलीस स्टेशनचे ठाणेदार राजपूत यांना शरद गावातील ग्रामस्थांनी व महिलांनी निवेदन दिले ग्रामस्थांच्या निवेदनावर साह्य आहे. पोलीस पाटील यांच्याबद्दल ग्रामस्थांनी ठाणेदार राजपूत यांच्याकडे नाराजी व्यक्त केली. तेव्हा कोरपणा पोलीस स्टेशन याकडे लक्ष देऊन गावातील दाखवते दारू विक्री बंद करतील काय याकडे सर्व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. कल्पना पोलीस विभागांच्या वतीने दारू बंद न झाल्यास चंद्रपूर जिल्हा अधीक्षकांकडे समस्त गावकरी धाव घेतील असे मत येथील महिलांनी व्यक्त केले. दारू विक्री करणाऱ्या महिला कोणत्याही कारणाने गावातील नागरिकांसोबत भांडण करत आहे.दारू विक्री करणारे महिलांच्या काही अंतरावर जिल्हा परिषद शाळा ग्रामपंचायत अंगणवाडी शासकीय कार्यालय असल्याने याचा नाहक त्रास विद्यार्थ्यांवर होत आहे. या बाबींना कंटाळून अखेर शरद गावातील महिलांनी कोरपणा पोलीस स्टेशनला धडक देत निवेदन दिले

## कायमस्वरूपी शिक्षक देण्याच्या मागणीसाठी शिक्षणाधिकाऱ्यांच्या दालणात शाळा भरविण्याचा इशारा; शिक्षण अधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

मेहकर/प्रतिनिधी : तालुक्यातील मागणी येथील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळेसाठी कायमस्वरूपी शिक्षक देण्यात यावा अन्यथा २१ फेब्रुवारी रोजी माननीय येथील विद्यार्थ्यांची बुलढाणा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या दालनात शाळा भरवण्यात येईल, असा इशारा मादणी येथील येथील सरपंच भाऊराव वामन जावळे यांनी बुलढाणा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदनाद्धारे दिला आहे.

निवेदनात नमूद केले आहे की मागणी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेवर कायमस्वरूपी शिक्षक नियुक्त करावा यासाठी २१ जानेवारी रोजी बैठा सत्याग्रह आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता त्यानंतरही वारंवार मागणी करण्यात आली मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. मेहकर तालुक्याच्या सर्व शाळांच्या सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांचे हे शिक्षक पं. स. मध्येच काम पाहतात. त्यामुळे नियमानुसार सरोदे यांची मादणीच्या शाळेवर अध्यापनासाठी तात्पुरती प्रतीनियुक्ती सुध्दा करता येत नाही.

मादणीच्या शाळेवर सरोदे यांची यातुर मातुर नियमबाहय तात्पुरती नियुक्ती करून, शैक्षणिक हिताचे माझे न्याय बैठा सत्याग्रह आंदोलन चिरडुन टाकण्याचा, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करण्याचा गट शिक्षणाधिकारी पं.स. मेहकर यांचा पुर्व नियोजीत डाव व केवीलवाना प्रयत्न आहे. त्यामुळे आम्ही गावकरी व विद्यार्थ्यांचे पालक सरोदे यांची नियुक्ती मान्यच करत नाही.गेल्या पाच वर्षापासुन प्रमोद भा. रायमुलकर मादणीचे शाळेवर गणित विज्ञानचे विषय शिक्षक असुन सुध्दा त्यांच्याकडे तिन प्रभार असल्यामुळे ते आजपर्यत



शाळेत आलेलेच नसल्यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे व होत आहे.मादणीच्या शाळेतर शिक्षक देण्याचे गटशिक्षणाधिकारी पं. स. मेहकर यांना माझे मार्फत व्हाट्स पवर जे पत्र दिलेले आहे, परंतु योग्य त्या विषय शिक्षकाची मादणीच्या शाळेवर अदयापही कायमस्वरूपी प्रतीनियुक्ती गटशिक्षणाधिकारी पं. स. मेहकर यांनी केलेली नाही. प्रमोद भा. रायमुलकर यांची गटसमन्वयक पदी नियुक्ती मु.का.अ., शि.अ.प्रा.जि.प.बु. यांच्या स्वाक्षरीने झालेली असल्यामुळे, रायमुलकर यांच्या गटसमन्वयक पदाबाबतचा निर्णय यांनीच घ्यावा, तो अधिकार गटशिक्षणाधिकारी पं. स. मेहकर यांना नाही. परंतु प्रमोद रायमुलकर यांच्याकडील प्रभारी केंद्रप्रमुख व प्रभारी शिक्षणविस्तार अधिकारी या पदाचे प्रभाराबाबतचा निर्णय गटशिक्षणाधिकारी यांनीच घ्यावा, तो त्यांचाच अधिकार आहे. मादणीचे जि.प.उच्च प्राथमिक शाळेवर अध्यापणासाठी कायमस्वरूपी विषय शिक्षक नियुक्तीचा निर्णय शिक्षणाधिकारी, प्राथमिक जि.प. बुलडाणा यांनीच सात दिवसाच्या आत घेण्यात यावा. अन्यथा मादणीच्या शाळेतील वर्ग ६ ते ८ चे विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यासह २१ फेब्रुवारी २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी, यांच्याच दालणात दुपारी११ वाजता सामुहीक राष्ट्रगीत घेवून तेथेच शाळा भरविल्या येईल, असा इशारा भाऊराव वामन जावळे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण अधिकारी यांना १३ फेब्रुवारी रोजी निवेदनाद्धारे दिला आहे. निवेदनाच्या प्रतिलिपी बुलढाणा जिल्हाधिकारी, साहेब, बुलडाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय, अमरावती विभाग शिक्षण उपसंचालक, पालकमंत्री मकरंद पाटील, शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे, आमदार सिद्धार्थ खरात यांच्यासह संबंधित विभागाला पाठवलेल्या आहेत.

## किसान मोर्चाच्या लोणार तालुका उपाध्यक्षपदी एकनाथ टेकाळे यांची निवड



दैनिक आपला विदर्भ

बिबी : लोणार तालुक्यातील भुमराळा येथील शेतकरी कुटुंबातील एकनाथ बाबुराव टेकाळे यांची भारतीय जनता किसान मोर्चाच्या तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली ही नियुक्ती जिल्हा अध्यक्ष संतोष बापू देशमुख यांच्या आदेशाने तालुका अध्यक्ष गजानन वरकड यांनी केली असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व संघटना मजबूत करण्यासाठी ही निवड करण्यात आली यावेळी तालुका अध्यक्ष भगवानराव सानप,युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप, शहर अध्यक्ष शुभम बनमेरू,यवा मोर्चा तालुका अध्यक्ष राम डुकरे, सरचिटणीस गजानन मापारी,सह पदाधिकारी उपस्थित होते

## पेनटाकळी पुनर्वसनाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी नागरिकांचे आठ दिवसापासून उपोषण

### आमदार सिद्धार्थ खरात यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेत सदर प्रश्न निकाली काढण्याचे दिले निर्देश






दैनिक आपला विदर्भ

मेहकर/प्रतिनिधी : येथून जवळच असलेल्या पेनटाकळी येथील ३५ वर्षांपासून पेनटाकळी नवीन गावठाण पुनर्वसना प्रश्न प्रलंबित असून सदर प्रश्न तात्काळ निकाली काढावा यासाठी येथील गावकऱ्यांनी ६ फेब्रुवारी पासून पेनटाकळी धरणात उपोषण सुरू केले आहे. सदर प्रश्नाबाबत आमदार सिद्धार्थ खरात यांनी पहिल्याच दिवशी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांना सदर प्रश्न निकाली काढण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार १३ फेब्रुवारी रोजी आमदार सिद्धार्थ खरात यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फोनवरून संपर्क करून सदर प्रश्न दोन दिवसात मार्गी लावण्याचे निर्देश दिले. तर तेथून डायरेक्ट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून महत्वपूर्ण बैठक घेत सदर प्रश्न तत्काळ निकाली काढण्याची निर्देश दिले. या बैठकीस आमदार सिद्धार्थ खरात, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाध्यक्ष जालिंदर बुधवत, जिल्हा परिषद सदस्य संजय वडतकर,अप्पर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, उपविभागीय अभियंता शरद नागोरे, नगर रचनाकार सतिश वेरूळकर, पेनटाकळीचे सचिव जे.पी. मवाळ, सरपंच पी. एस.वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध विषयावर चर्चा करीत सदर प्रश्न निकाली काढण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या. तर सेच अप्पर जिल्हाधिकारी, रचनाकार विभागातील व कार्यकारी अभियंता जिगाव प्रकल्प व देऊळगाव राजा, उपविभागीय अधिकारी मेहकर यांच्याशी चर्चा केली. उपलब्ध जागेत २४९ ऐवजी रस्ते आणि मोकळी जागा कमी करून ३८१ प्लॉट असा आराखडा तयार केला. हा प्रश्न तत्काळ मार्गी लावण्यासाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या वेळी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाध्यक्ष जालिंदर बुधवत, जिल्हा परिषद सदस्य संजय वडतकर, मेहकर शहर अध्यक्ष किशोर गारोळे, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय वडतकर, युवा सेनेचे तालुका अध्यक्ष ड. आकाश घोडे,संदीप गारोळे, योगेश कंकाळ यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाची मोठी कारवाई, १९ लाखांचा बनावट विदेशी दारूसाठा जप्त



दैनिक आपला विदर्भ

कल्याण/प्रतिनिधी : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने पडघा व कर्जतमधील गोडाऊनवर छापेमारी करत १९ लाखांचा बनावट विदेशी दारूसाठा जप्त केला.तसेच श्रीकांत टरले, किशोर पाटील, प्रदीप बामणे या तीन आरोपींना अटक केली. फक्त माहितीनुसार गोव्याहून स्वस्त दारू आणून रिकाम्या बाटल्यांमध्ये भरून नवीन स्टिकर लावून दारू विक्री केली जात असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली. या माहितीवरून नेवाळी येथे नाही चाफेमारी करीत १९ लाखाचा मध्यमाल जप्त केला तसेच तीन आरोपींना अटक केली. तसेच या प्रकरणाचा पुढील तपास राज्य उत्पादन शुल्क विभागाचे भरारी पथक कल्याण अधिकारी दिपक परब करीत आहेत.

### जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपात करणाऱ्या रॅकेटचा केला पर्दाफाश






दैनिक आपला विदर्भ

कोल्हापूर/प्रतिनिधी : कोल्हापुरात गेल्या दोन महिन्यांत गर्भलिंग निदान आणि गर्भपाताची दुसरी कारवाई करण्यात आली आहे. कोल्हापुरातील कळंबा येथे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपात करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केलाय. साई मंदिराजवळील श्रद्धा हॉस्पिटल येथे हे सेंटर चालवले जात होते. यावेळी गर्भपाताच्या गोळ्यांची विक्री करणाऱ्या दोघी महिलांनाही वरणगे पाडळी येथून रंगेहात पकडण्यात आले आहे. दरम्यान गेल्या दोन महिन्यांत दोन कारवाया झाल्याने वैद्यकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

### घाणेवाडीच्या ७० एकर जमिनीवर साकारणार सौर ऊर्जा प्रकल्प, अर्जुन खोतकर यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

जालना/प्रतिनिधी : जालन्यातील घाणेवाडीच्या ७० एकर जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प साकारणार असून, महानगर पालिकेचे दरमहा चार ते पाच कोटी रुपये वाचणार असल्याची माहिती शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी दिलीये. खोतकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिलीये. जालना शहराला जायकवाडी आणि घाणेवाडी तलावातून पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे कोट्यवधी रुपयांचं वीज बिल महानगरपालिकेला येतं. त्याचबरोबर शहरातील पथदिव्यांचंही वीज बिल मोठ्या प्रमाणात येतं. त्यामुळे शहराच्या विकासाला थोडी खिळ बसत आहे. याचाच विचार करून खोतकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नातून ९५ कोटी रुपयांचा सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर केला आहे. घाणेवाडीच्या ७० एकर जमिनीवर हा प्रकल्प होणार असून, पालिकेचे चार ते पाच कोटी रुपये वाचणार असल्याचं खोतकर यांनी म्हंटलंय.



भाग १०

# निकृष्ट कामाबाबत न्यायालयात दाद मागण्याचा ग्रामसभेचा ठराव


कोट्यवधी रुपयाचे काम अर्धवट अंजनीवासीयांना पाणी टंचाईचे चटके

लांडेवाडी येथील जलजीवन मिशनची योजना झाली पास;गावकऱ्यांना नाही पाण्याचा वास..

जल जीवन मिशनचे भ्रष्टाचाराचे केंद्र मेहकर : आ. सिद्धार्थ खरात

जलजीवन मिशनच्या कामाच्या चौकशीचा केवळ फार्स

आमदार सिद्धार्थ खरात यांचा आरोप कोणत्याही प्रकारची चौकशी झाली नसल्याची स्पष्टोक्ती

कोट्यावधी रुपयांच्या कामाला भ्रष्टाचाराची वाळवी?

चौकशी थंडबस्त्यात | तालुक्यातील जलजीवन मिशनचे काम अर्धवट

कोट्यावधी रुपये पाण्यात; डोणगाव तहानलेलेच

ग्रामस्थांच्या तक्रारीला अधिकाऱ्याची केराची टोपली

ग्रामस्थांमध्ये प्रशासनाप्रती तीव्र रोष

भाग ८

दैनिक आपला विदर्भ

मेहकर : तालुक्यातील अंजनी बुद्रुक हे येथील पाणीटंचाई निवारण्यासाठी शासनाने दोन वर्षापूर्वी जल जीवन मिशन अंतर्गत तब्बल पाच कोटी रुपयांचा निधी खर्च करून कामास प्रारंभ केला होता. मात्र, सदर काम हे अद्यापही पूर्ण झाले नाही. त्यामुळे अंजनी बुद्रुक वाशी यांना पाणीटंचाईच्या भीषण समस्येला सामोरे जावे लागत आहे.कोट्यावधीचा निधी खर्च करून काम अपूर्ण राहिले असल्याने ग्रामस्थांना पाणी टचाईचे चटके सोसावे लागत आहेत. याकडे आपण लक्ष देऊन येथील पाणीटंचाई निवारण्यासाठी उपाययोजना करावी, अशी मागणी अंजनी बु. येथील ग्राम पंचायतच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. सदर निवेदनाला एक वर्षाचा कालावधी होत असतानाही अधिकाऱ्यांनी या

देविदास खनपटे मुख्य संपादक

अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे जलजीवन मिशनच्या चौकशीचे काम थंडबस्त्यात

ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने करण्यात आला निकृष्ट कामाचा आरोप

अंजनी बु. येथील प्रकार : वरिष्ठ अधिकाऱ्याने दाखवला ग्रामसभेच्या ठरावाला ठेंगा

दैनिक आपला विदर्भ

भाग ९

JAL JEEVAN MISSION

अधिकाऱ्यांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह

13 Feb 2025 - Page 4 | www.aapalavidarbh.com

JAL JEEVAN MISSION

## ■ अंजनी बुद्रुक येथील जल जीवन मिशनच्या कामात भ्रष्टाचार
## ■ कंत्राटदाराच्या कामाला ग्रामपंचायत वैतागली

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथील येथे जलजीवन मिशन अंतर्गत तब्बल चार कोटी ९८ लाख रुपयांच निधी खर्च करून पाणीपुरवठा करण्याचे काम करण्यात आले आहे. सदर कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने, यामध्ये दररोज अनेक समस्या निर्माण होत आहेत. सदर समस्या निवारण्यासाठी ग्रामपंचायतला खर्च करून आपला वेळ द्यावा लागत असल्याने जल जीवन मिशनच्या निकृष्ट कामाच्या व भ्रष्टवृत्तीच्यामुळे अंजनी बुद्रुक ग्रामपंचायत प्रशासन चांगलेच वैतागले असून या कामाबाबत आता आपण न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय ३१ जानेवारी २०२५ रोजी ग्रामसभेद्वारे घेतला असल्याने हे प्रकरण आता वेगळे वळण घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथे पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघावा, यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत कोट्यवधी रुपयाचा खर्च करून काम करण्यात आले आहे. मात्र, संबंधित विभागाच्या दुर्लक्षित धोरणामुळे व कंत्राटदाच्या मनमानीमुळे तसेच अधिकारी यांच्या मिलीभगत वृत्तीमुळे सदर कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तर, या कोट्यावधी रुपयाचा ग्रामस्थांना फायदा होण्याऐवजी त्रास होत आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे जल जीवन मिशन योजनेअंतर्गत केलेली पाईप लाईन दररोज फुटत आहे त्यामुळे ग्रामस्थांना पाणीपुरवठा नियमित करण्यास व्यक्ती निर्माण होत आहे फुटलेली पाईप लाईन दुरुस्त करण्यासाठी संबंधित ठेकेदार दुर्लक्ष करीत आहे तर ग्रामस्थांचे समस्या लक्षात घेता सदर पाईपलाईन ही ग्रामपंचायत अंतर्गत दुरुस्ती करावी लागत आहे त्यासाठी ग्रामपंचायतीला साहित्य पोटी एक लाख दहा हजार सातशे दहा रुपये व मजुरी पोटी ८३ हजार ७७० रुपये खर्च आलेला आहे त्याचबरोबर पाईपलाईन टाकल्यानंतर काही ठिकाणी सिमेंट काँक्रेट ची रस्ते खोदण्यात आलेले आहेत ते व्यवस्थित पुन्हा दुरुस्त करण्यात आले नाही ते कामही ग्रामपंचायतला करावी लागत आहे जलजीवन मिशन अंतर्गत असलेली कामे संबंधित ठेकेदारांनी न करता ग्रामपंचायतीला करावी लागत असल्याने ग्रामपंचायतवर विनाकारण आर्थिक दंड बसत आहे याप्रकरणी मेहकर उपविभागीय अभियंता यांना ग्रामसभा ठरावाची ग्राम ठराव घेऊन संबंधित जलजीवन मिशनच्या कामाची चौकशी करावी व एक महिन्यात सदर काम हे सदर चौकशी पूर्ण करावी अन्यथा न्यायालयात दाद मागण्यातील असा ठराव घेत संबंधित विभागाला पाठविण्यात आलेला आहे ग्रामसभेने घेतलेल्या या ठरावावर संबंधित अधिकारी गांभीर्याने लक्ष देत नसतील तर सामान्य जनतेच्या तक्रारीकडे संबंधित विभाग तक्रारीची संबंधित विभाग काय दखल घेणार हा प्रश्न निर्माण झाला आहे जल जीवन मिशनच्या या निकृष्ट कामाबाबत मात्र ग्रामसभेने न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतल्याने या प्रकरणाला आता वेगळे वळण येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.





देविदास खनपटे
मुख्य संपादक

JAL JEEVAN MISSION

### अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथील जल जीवन मिशनच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याने शासनाचा कोट्यावधी रुपयाचा निधी हा पाण्यात गेला आहे. या प्रकाराबाबत ग्रामसभेने ठराव घेत संबंधित कामाची चौकशी करून दोषीवर कारवाई करावी असा ग्रामसभेचा ठराव घेत संबंधित वरिष्ठ विभागाला विभागाच्या अधिकाऱ्यांना दिला आहे. मात्र अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने ग्रामसभेने आता चक्क न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेतल्याने अधिकाऱ्याच्या कार्यप्रणालीवर मात्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## विविध वृत्त...

### सोमवारी महिला लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

बुलडाणा/प्रतिनिधी : दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने फेब्रुवारी महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.

### जिल्हास्तरीय फुटबॉल युथ लिग स्पर्धा; ३0 फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

बुलडाणा/प्रतिनिधी : फुटबॉल खेळाची शालेय विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण होण्यासाठी प्रथमच जिल्हास्तरीय युथ फुटबॉल लिग स्पर्धे चे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील शाळा व फुटबॉल क्लबमधील १६ वर्ष वयोगटातील खेळाडूंनी ३० फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी केले आहे.

फुटबॉल या खेळाचा प्रचार व प्रसार समाजातील प्रत्येक खेळाडूंपर्यंत व्हावा यासाठी जिल्हा क्रीडा कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युथ फुटबॉल लिग सन २०२४-२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हातील सर्व शाळेतील १६ वर्ष वयोगटातील खेळाडुंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील विविध शाळेतील संघाची नोंदणी जिल्हा क्रीडा कार्यालय बुलढाणा येथे ऑफलाईन विनामूल्य नोंदणी करून संघाची यादी दि. ३0फेब्रुवारी २०२५ पर्यंत कार्यालयात जमा करून प्रवेश निश्र्चित करावा. सदर स्पर्धे साठी खेळाडुंची वयोमर्यादा १ जानेवारी २००९ नंतरचा जन्म झालेला खेळाडु स्पर्धेकरीता पात्र राहील. स्पर्धेची तारीख नंतर कळविण्यात येईल.

फुटबॉल युथ लिग स्पर्धेसंदर्भातील अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे किंवा एन.आर.वानखडे (९९६0४३४४८७), डॉ. जे. डब्ल्यु मोहोड(९४0५७३४४0३), मुकेश बाफणा (९४२२८८११0५), एस.एस. केळे(९४२३४४६५१६) यांच्याशी संपर्क साधावा, अशी माहिती जिल्हा क्रीडा कार्यालयाव्दारे कळविण्यात आली आहे.



## दहावी, बारावी शालांत परीक्षा; परीक्षाकेंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

दैनिक आपला विदर्भ

बुलडाणा/प्रतिनिधी :माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय प्रमाणपत्र परीक्षा दि. ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या कालावधीत १६६ केंद्रावर होणार आहे. ही परीक्षा शांत व सुरक्षित वातावरणात पार पाडावी यासाठी सर्व परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्याचे आदेश अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी दिले आहेत. यासंदर्भात जारी केलेल्या आदेशात म्हटल्यानुसार परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुवव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहीता-२०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हयामधील ११६ केंद्रावर दि. ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ रोजी सकाळी ६ ते सायं ८ वाजेपर्यंत परिक्षा केंद्राच्या आतील संपूर्ण परिसरात व केंद्राचे बाहेरील लागून असलेल्या परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत आहे.

अटी व शर्ती : परिक्षा केंद्राचे परिसरामध्ये प्रवेश करतेवेळी ५ पेक्षा जास्त व्यक्ती एकत्रीतरीत्या प्रवेश करणार नाहीत तसेच कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणेबाबत मज्जाव करण्यात येत आहे. परिक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षार्थी अथवा अन्य व्यक्तींकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करण्यात येणार नाही. परिक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, फॅक्स मधीन, पानपट्टी, लॅपटॉप, टायपिंग सेंटर, एसटीडी बुध ध्वनीक्षेपक इत्यादी माध्यम परिक्षा संपेपर्यंत बंद ठेवण्यात यावेत. परिक्षा केंद्राचे परिसरात इंटरनेट,मोबाईल फोन,सेल्युलर फोन,ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई राहील.परिक्षा केंद्रावर कोणत्याही अनधिकृत व्यक्ती, वाहनास प्रवेशास मनाई राहील. परिक्षा केंद्रावरील नियुक्त अधिकारी, कर्मचारी, परिक्षार्थी तसेच परिक्षा केंद्रावर देखरेख करणारे अधिकृत अधिकारी, कर्मचारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना सदर प्रतिबंधात्मक आदेश परिक्षासंबंधी कर्तव्य पार पाडण्याचे दृष्टीने लागू राहणार नाहीत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# जावयाचा सासुरवाडीतील नागरिकांना चुना!

## चोरीचे ऑटो विकून फसवले : कागदपत्रे न पाहताच ऑटो घेणारे झाले आरोपी

दैनिक आपला विदर्भ

मेहकर/प्रतिनिधी : बेरोजगारी वाढल्याने आणि श्रमाचे काम करण्याला बगल देत जो तो कमी पैशात ऑटो खरेदी करत ऑटो चालवून पैसे कमावण्याच्या नादाला लागला आहे. त्यामुळे ऑटोंचा सुळसुळाट झाला आहे. मात्र मेहकर शहरात कमी पैशात दाखल होणाऱ्या ऑटो जेव्हा सत्य समोर आले तेव्हा अनेकांच्या पायाखालची वाळू सरकली असून मेहकरच्या जावयाणेच पनवेल येथू चोरीचे ऑटो आणून मेहकरला विकत सासुरवाडीतल्या लोकांना गंडा घातल्याचे समोर आले आहे. मेहकर शहरात तब्बल १५ आटो पकडले असून अनेक चोरीचे ऑटो बुलढाणा व वाशीम जिल्ह्यात असण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

मेहकर येथील मॅकेनिक शे सिकंदर व ऑटो चालक शे लाल हे मागील काही महिन्यापासून कमी किमतीत ऑटो विकत होते. काही ऑटो रोजंदारीवर चालवायला देत होते.ज्याने मेहकर मध्ये ऑटोचा सुळसुळाट आला. कोणाला ५० हजारात ऑटो तर कोणाला १०० रुपये रोजंदारी वरती ऑटो असा ऑटोचा कारभार दिवसेंदिवस वाढत चालला होता. या प्रकरणाची भनक पनवेल पोलिसांना लागल्यानंतर त्यांनी ११ फेब्रुवारी रोजी येऊन चोरीच्या ऑटोचा पर्दाफाश केला. मेहकर येथील जवाई निसार सत्तार खान वय ३८ वर्षे रा.पनवेल येथे कच्ची महोल्ला परिसरात ऑटो चोरी करण्याच्या प्रयत्नात असतांना त्याला पनवेल पोलिसांनी ४ किमी पाठलाग करत पकडले व पनवेल मेन पोलीस स्टेशनला आणले असता त्यांनी ऑटो चोरीची सीसीटीव्ही फुटेज पहिले असता मागिल ऑटो चोरीला गेले तो आणि ऑटो चोर सारखा दिसून आला. तेव्हा त्याला खाक्या दाखवताच त्याने मेहकर कनेक्शन उघड केले. मेहकर मध्ये ऑटो घेणारे व विकणारे कोणतेही कागदपत्र न पाहता सरळ चोरीचे ऑटो ४० ते ५० हजाराला विकत घ्यायचे चोरच त्यांना स्वतःच्या नावाने करार नामा करून द्यायचा ज्यात कित्येक ऑटो हे सहा महिने जुने तर काही एक ते दीड वर्षे जुने होते.ज्याची किंमत दोन ते अडीच लाखा रुपये असून चोरटा त्याला भंगार म्हणून विकायचा. जावई या नात्याने मेकर येथील नागरिकही निसार खान याच्यावर विश्र्वास ठेवत ऑटो विकत घ्यायचे मात्र सदर ऑटो हे चोरीचे असल्याने ते कमी किमतीत मेकरत विकून जावयाने सासरवाडीतील लोकांनाच गंडाघाटल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.याप्रकरणी पनवेल पोलिसांनी १५ ऑटो ताब्यात घेतली असून ऑटो विकत घेणारे मात्र, आता आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहिले आहेत.



### मेकर वाशिम रिसोड परिसरात ऑटो विक्री केल्याची शक्यता

पनवेल येथून ऑटो चोरून ते मेकर वाशिम रिसोड येथे विक्री करीत असल्यास माहिती पनवेल येथील पोलिसांना मिळतात त्यांनी मेकर येथे दाखल होत १५ आटो पकडले आहेत तसेच मेकरचा जावई नासिर खान यांनी मेकर बरोबरच रिसोड व वाशिम येथे ही मोठ्या प्रमाणात ऑटोची विक्री केली असल्याची चर्चा असून याबाबत पोलीस तपास करीत आहेत सदर ची कारवाई पनवेल येथील पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस उपनिरीक्षक लभडे यांनी मेहकर उपविभागीय अधिकारी प्रदीप पाटील व ठाणेदार भावराव घुगे यांच्याशी बोलून सहयोग देण्याचे सांगितले आणि ठाणेदार यांनी लक्ष्मण कटक यांना पनवेल येथून आरोपी घेऊन आलेले हवालदार परेश म्हात्रे,अविनाश गनथडे, पोलीस नाईक विनोद देशमुख, पोलीस शिपाई किरण कराड यांनी आरोपी चोर निसार सत्तार खान यांनी दाखवलेल्या ठिकाणी जावून ऑटो हस्तगत केले. चोरट्याने मेहकर, लोणार वाशीम जिल्ह्यातील रिसोड या परिसरात चोरीचे ऑटो निघण्याची शक्यता निर्माण झाली आहे.